

# लक्ष्मीपूजनाचे साहित्य खरेदीसाठी बाजारात नागरिकांची गर्दी

## आज दिवाळी घराघरात होणार लक्ष्मीपूजन,झेंडूचे फुले,केळीचे पान,फळ, लक्ष्मीची मूर्ती,पणत्या बोडके,लाह्या भत्तासे साहित्याने बाजार फुलला













**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :**

आज वर्षातला सर्वात मोठा सण दिवाळी सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. दिवाळीला घराघरात व दुकान व्यवसाय प्रतिष्ठाने असे सर्वत्र लक्ष्मीपूजन करण्यात येतो त्यासाठी लागणाऱ्या साहित्याने बाजारपेठ खुलून गेली आहे बाजारामध्ये झेंडूचे फुल, केळीचे खांब आंब्याची पाने लक्ष्मीच्या मुर्त्या लाह्या बत्तासे पणत्या बोडके या साहित्याचे दुकाने मार्केटमध्ये सर्वत्र थाटली असून यावर प्रचंड गर्दी झाल्याचे पाहायला मिळत आहे. बाजारामध्ये झेंडूची फुले २५ ते ३० रुपये किलोने विकल्या जात असून शंभर रुपयांमध्ये पाच केळीचे खांब दहा रुपयांमध्ये आंब्याचे पानं, चाळीस रुपये पाव भत्तासे दहा रुपयाला लाह्या ५० ग्रॅम च लक्ष्मीची मूर्ती शंभर रुपयापासून बाजारामध्ये विकल्या जात आहेत सुंदर व आकर्षक मुर्त्यांनी बाजार खुलून गेला आहे शहरातील मुख्य बाजारपेठ जयहिंद चौक, जठारपेठ, सिंधी कॅम्प, गौरक्षण रोड अशा अनेक भागांमध्ये या साहित्याची दुकाने लागली असून त्यावर नागरिकांनी एकच गर्दी केल्याचे दिसून आले. यावर्षी भरपूर पाऊस झाल्या मुळे सोयाबीनची पिके शेतकऱ्यांच्या हाती लागले नाहीत जे थोडे बोध सोयाबीन आहेत ते एकरी दोन ते तीन क्विंटल एवढेच होत आहे त्याला काढणे सोमणे या खर्चालाही शेतकऱ्याला परवडत नाही पावसाळा जास्त झाल्यामुळे अजून कापूस शेतकऱ्यांच्या घरात आला नाही त्यामुळे शेतकऱ्यांचवड सध्या पैसाच नाही तसाच शेतमजूर सुद्धा ठणठण आहे त्यामुळे बाजारामध्ये जे नवचैतन्य पसरले आहेत ते नौकर वर्गाचे आहे त्यांना भरमसाठ पगार असल्यामुळे व शासनाचे बोनस वेगवेगळे भत्ते मिळत असल्याने त्यांची दिवाळी नेहमीच अति उत्साहात आनंदात असतो तसाच उत्साह गेल्या आठवड्याभरापासून बाजारपेठेमध्ये दिसून येत आहे. कपड्यांच्या दुकान वर नोकरवर्गांचीच गर्दी दिसून आली शेतकरी कापड दुकानांवर फटकलेच नाही असे चित्र मार्केटमध्ये होते तसेच धनत्रयोदशीला सोने खरेदी करण्याकरता व्यापारी उद्योजक व नोकरवर्ग यांच्या परिवारानेच गर्दी केली होती व यांनी सोने-चांदी खरेदी केले सोन्याचे दर एक लाख तीस हजाराच्या वर गेले असून शेतकऱ्यांच्या खिशामध्ये हजार रुपये सुद्धा नाही तर तो धनतेरसला काय सोने खरेदी करणार मात्र लवकर वर्गाला भ्रम साठ पगार असल्याने त्यांनी मात्र सोने चांदी खरेदी केली.

दिवाळी म्हटलं की घरांवर रोष नाही घरा समोर पण त्यांचे आरास आकर्षक रांगोळ्या सर्वत्र आकाश कंदील लावलेले दारावर तोरणे व वेगवेगळे सजावटीचे साहित्य खरेदी केल्या जातात या सर्व साहित्याची दुकाने गेल्या आज दिवसापासून शहरातील वेगवेगळ्या भागांमध्ये लागली असून आज लक्ष्मीपूजनाच्या साहित्याची दुकानांनी रस्ते गजबजून गेले होते शहरातील मुख्य बाजारपेठ मध्ये चालायला सुद्धा जागा नव्हती. दिवाळी सण वर्षातून एक वेळा येतो या सणाला नवीन कपडे घरामध्ये नवीन साहित्य घराला रंग देणे हे पूर्व पार चालत आलेली प्रथा आहे या प्रथेप्रमाणे प्रत्येक जण आपल्या ऐपतीप्रमाणे कपडे लागते साहित्य दिवाळीचे फराळ व वेगवेगळ्या वस्तू खरेदी करत असतो वर्षभर काही खरेदी केली नाही तरी हरकत नाही पण दिवाळीत काहीतरी खरेदी केली पाहिजे ही भावना प्रत्येकाची असते त्यामुळे प्रत्येक जण आपल्या परीने काहीतरी साहित्य नवीन कपडे खरेदी करतो शहरांमध्ये फटाका मार्केट मध्ये मोठा उत्साह दिसून आला फटाका मार्केटमध्ये लागलेल्या सर्व दुकानांवर फटाके घेण्याकरता लोकांनी खूप गर्दी केली होती पण दरवर्षीपेक्षा जास्त यावर्षी फटाका विक्रेत्यांचा व्यवसाय झाला असेल दरवर्षी पेक्षा जास्त लोकांनी फटाके खरेदी केले असेच फटाका मार्केट मधल्या गर्दीवरून दिसत होते तर शासनाने अनेक वस्तूंवरचा जीएसटी कमी केल्याने मोठ्या वस्तू वाहने खरेदी करण्याकडे लोकांचा कल दिसून आला.

# दिपावली महालक्ष्मी पुजनाने आत्मसंतोष भवनमध्ये झाला जल्लोश

## धनत्रयोदशीला धनलक्ष्मी पुजन सपन्न



**▪हिवरखेड,दि २० (प्रतिनिधी) :**

मुख्य ओंमशाती शाखा आत्म सतोंष भवनमध्ये दिपावलीच्या शूभमूहर्तावर सर्व दिवाळी नीमीत्त दिपसजावटी ने झगमगाट सूशोभीत करन्यात येऊन संचालीका रश्मीं दीदीच्या अधिपत्याखाली यजमान म्हनून झालेले महादेव नेवारे सौ अनिता नेवारे यांचे शूभहस्ते व रमेश दुंतोडे सह धनत्रयोदशीला धनलक्ष्मि माते ची सर्व शाखेतिल भाऊ बहीनीच्या अतीथी सह महालक्ष्मिमातेला धनलक्ष्मीमातेची महाआरती करन्यात आली प्रथम दिदी व यजमानानी धनलक्ष्मी महालक्ष्मी झालेल्या देवीला औक्षन पुजन केले व दिदी कडुन यम ानान यांना औक्षन करुन औमशांती शाखेचे ऊपरने प्रदान करन्यात आले या नंतर सर्वांनी मातेचा गजर व गरबा खेळत भाईलोकानी लक्ष्मीमातेला सर्वासाठी सुख समृद्दी शेतकरी कष्टकरी श्रमीक याना व देशातील सर्वाना धनधान्य सपंतीने सूखी कर असा आशीर्वाद मागीतला त्यानंतर सर्व शाखेतील मातानी दिप आरती घेऊन पुर्ण आत्म सतोंष भवनमधे दिपमाळेने ओवाळुन टाकले तर संजय म्हसाळ यांनी गायीलेल्या मातेच्या आरतीने सर्वांनी धनलक्ष्मीला प्रसन्न करून ऊपस्थीत सर्वाना मूख्य शाखेच्या कडुन टोली म्हनुन दिवाळीचे फराळ वाटन्यात आले.यावेळी सरस्वती कॉनवेन्टच्या मुख्याध्यापीका प्रमीला मानकर. लक्ष्मन हिवराळे मोहन मानसेता निंबोकारताई पोकेताई तारापुरे ताई, ताळे ताई, प्रमुख ऊपस्थीती मधे हजर होत्या

# शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षितच असावा

**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :**

शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही फक्त स्कूल बसमधूनच व्हावी असे नसून, विद्यार्थी हा रस्त्याने जात असताना किंवा इतर कुठल्याही वाहनातून प्रवास करत असताना तो सूरक्षितच असावा असे मानणारे प्रादेशिक परिवहन अधिकारी रविंद्र भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या विविध शाळांम ध्ये सुरू असलेल्या दिवाळी उत्सवात परिवहन विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या ने-आण प्रवासाबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. शहरा नजिकच्या चांदूर येथे बाबा माध्यमिक पुंडलिक विद्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून मोटार वाहन निरीक्षक त्रिवेणी गालिंदे यांनी उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकांना दिवाळीमध्ये वाहनातून प्रवास करत असताना तसेच वाहनावर बसून (दुचाकीवरून) प्रवास करत असताना घ्यावयाची काळजी, पाळायचे नियम तसेच दिवाळीमध्ये रस्त्यावर फटाके उडवत असताना अचानक वाहने रस्त्यावर येतात अशावेळी अपघात होऊ नये, यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना परिवहन विभागांमध्ये करिअर करण्यासाठी लागणाऱ्या पात्रता परीक्षेचे स्वरूप अभ्यासक्रम याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका कुसुम हरणे मॅडम यांनी केले. यावेळी महिला पालक वर्गाच्या स्पर्धांचे बक्षीस वितरण त्रिवेणी गालिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

# वाचन संस्कृती वृद्धींगत करण्याची गरज

## - उपविभागीय अधिकारी शरद जावळे


### बाबूती देशमुख वाचनालयात दिवाळी अंक प्रदर्शनी



**▪अकोला,दि २० (प्रतिनिधी) :**

वाचनाने व्यक्तीमत्वाची जडणघडण होते. पुस्तके वाचनाने ज्ञानवृद्धी होते. रोजगाराची संधी मिळते. वाचन म्हणजे जीवनाला उन्नत करणारी गोष्ट म्हणून वाचन संस्कृती वृद्धींगत करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांनी केले.बाबूजी देशमुख वाचनालयात दिपावली निमित आयोजित दिवाळी अंक ग्रंथ प्रदर्शनी चे उद्घाटन प्रसंगी बोलत होते. वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वाचनालयाचे सचिव अनुराग मिश्रा, सदस्य विनोद अग्रवाल, प्रविण वाणी, बबनराव कानकिरड, प्रमोद रत्नपारखी यांची प्रमुख उपस्थिति होती.

आपण बाल कुमारांना वाचनासाठी प्रवृत्त केले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तकांच्या ठिकाणी इंटरनेट कडे प्रवाह वाढतो आहे. विधार्थी मोबाईल चा वापर करतात. पण वाचना चे स्थान अढळ आहे. खरे मानसिक समाधान पुस्तक वाचनात असल्याचे प्रतिपादन डॉ. शरद जावळे यांनी केले. स्वातंत्रया पूर्वी या वाचनालयाची स्थापना झाली. चोखंदळ वाचकांसाठी ग्रंथ प्रदर्शनी च्या माध्यमातुन अभिजात मराठी ग्रंथ संपदा बाबूजी देशमुख वाचनालय सातत्याने उपलब्ध करून देत असल्याचे प्रतिपादन महादेवराव भुईभार यांनी अध्यक्षीय भाषणातून केलेकार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. मोहन खडसे यांनी केले.शालेय, महाविधालय,स्पर्धा परीक्षेचे विधार्थी, वाचक मोठ्या संख्येत उपस्थित होते. ग्रंथपाल सुरेश टेके, सतिश डगवले, जुगल शिरसाट, नितीन कदम, स्वप्नील ताथोड, सुनील मिश्रा यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी अथक परिश्रम घेतले.

# सूर्योदय बालगृहातील बालकांसोबत न्यायाधीशांनी साजरी केली दिवाळी

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

सूर्योदय बालगृहाच्या वतीने २०/१०/२०२५ रोजी पहाटे ५ वाजता दिवाळी पहाट या उपक्रम साजरा करण्यात आला यावेळी जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीमती एम. एस. भदाणे, बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य अॅड.संजय सेंगर, बालकल्याण समिती अध्यक्ष अॅड अनिता गुरव सदस्य अॅड शीला तोशनीवाल बाल न्याय मंडळ सदस्य अॅड सारिका घीरणीकर जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री गिरीश पुसदकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री राजू लाडुलकर यांनी दिनांक २०/१०/२०२५ रोजी दीपावली साजरी केली या अंतर्गत सकाळी ५.३० वाजता प्रवेशित बालके यांनी साकारलेल्या जंजीरा किल्ला वर दिवे लावण्यात आले आकाश उडणारे कंदील सोडण्यात आले बालकांनी फुलझाड्या फटाके उडवले जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीमती एम एस भदाणे मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनात बालकांशी संवाद साधताना सांगितले की या जगात सर्वच लोक हे औषधोपचार घेतात आपण इतरांशी आपली तुलना कधी करू नये मी खरोखर भाग्यवान आहे की मला तुमच्या सोबत दीपावली साजरी करायची संधी



मिळाली भूतकाळात काय घडले याचा विचार न करता वर्तमान काळात जीवन आनंदाने जगा अॅड संजय शेंगर आणि गिरीश पुसदकर यांनी बालकांना दिपावली च्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रम संचालन सूर्योदय बालगृहाचे अधीक्षक शिवराज खंडाळकर यांनी केले या उपक्रमात चाईल्ड हेल्प लाईन चे हर्षाली गजभिये, शरयू तळेगाकर, राजेश मनवर, अपर्णा शहारे, गायत्री बालिकाश्रम च्या वैशाली भटकर, भाग्यश्री घाटे, उत्कर्ष शिशु गृहाचे उमेश पाटील, एन्करेज एज्युकेशनल चे महेंद्र गणोदे जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडूलकर, एसेस टू जस्टिस चे शंकर वाघमारे, विशाल गजभिये, सखी वन स्टॉप सेंटर चे अक्षय चतरकार तिक्षगत संस्थेचे उमेश शिरसाट आणि श्वेता शिरसाट सहभागी होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गौरी सरोदे, सपना खंडारे, रेखा बावणे, किरण अवचार, सचिन सातपुते राधिका कोरडे, प्रशांत देशमुख दीपक लुंगे श्री मोरे सर, जयश्री इखारे, सूर्योदय बालगृह कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# महागाईतही गृहिणींची दिवाळीची गोडी कायम!

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

दिवाळीचा सण साजरा करण्यात महिला गुंतल्या आहेत. महागाई शिगेला पोहोचली असली तरीही या महागाईतही गृहिणी दिवाळीची गोडी कायम ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत.महिलांची फराळ बनविण्याची लगबग सुरू झाली आहे. तर नोकरी-व्यवसायामुळे दिवसभर घरांपासून दूर राहणाऱ्या गृहिणीची पसंती तयार फराळालाच असल्याचे दिसून येत आहे. यंदा सर्वच प्रकारच्या वस्तूच्या दरांत दहा ते पंधरा टक्के वाढ झाली असली तरी दिवाळीची गोडी कायम असल्याचे स्पष्ट होत आहे.यावर्षी दिवाळीत अनेक वस्तूंचे भाव वाढल्यामुळे घर चालवताना गृहिणींना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. दिवाळीचा फराळ बनवायला लागणारे खाद्यपदार्थ, फटाके, कपड्यांचे भाव सातत्याने वाढले



आहेत. ही वाढलेली महागाई पाहता घराचा बजेट पाहून महिलांची तारांबळ उडत आहे. नोकरी-व्यवसायामुळे अनेक महिलांचा कलतयार फराळाकडेच आहे. दिवाळी म्हटले, की चकली, करंजी, अनारसे, लाडू, चिवडा, शंकरपाळे अशा तोंडाला चव येणाऱ्या पदार्थांची सरबत्ती असते. खमंग आणि स्वादिष्ट चकलीचे व अनारशाचे तयार पीठ बाजारात उपलब्धआहेत. पूजा साहित्य, पणत्या, देवीलक्ष्मी मूर्ती, फडे, फराळ, रांगोळी रंगांना बाजारपेठेत महिलांकडून विशेष मागणी होती.तसेच दिवाळी सणासाठी सजण्याकरिता महिलांची आर्टिफिशियल ज्वेलरीच्या दुकानात गर्दी होती. तर बहुतांश महिलांनी आपल्या घरीच फराळ तयार करून आपली पाककला समृद्ध केली. घरातील बच्चे कंपनीपासून वरिष्ठांपर्यंत सर्वांना नवीन कपडे आणि मिठाई तसेच भेटवस्तूही खरेदी केल्या. दिवाळीच्या या दिवसांमध्ये आपले घर सुंदर आणि आकर्षक दिसावे याकरिता म हिलांनी बाजारातून सजावटीचे सामान खरेदी केले.

# तेल्हारा दहिगाव रस्त्यावर अपघात एक ठार आठ ते दहा जण जखमी

■तेल्हारा,दि २० (प्रतिनिधी) :

दहिगाव रस्त्यावर अपघात एक ठार आठ ते दहा जण जखमी दिवाळीच्या पूर्वसन्याला मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या कुटुंबीयांवर संक्रांत तेल्हारा अडसूळ रस्त्यावर खापरखेड फाटा नजीक चार चाकी वाहन व ऑटो यामध्ये अपघात झाला असता एक जण ठार झाला असून आठ ते दहा जण जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे.

तेल्हारा येथून पंचगव्हाणकरता प्रवासी घेऊन ऑटो निघाला यामध्ये तेल्हारा येथे दिवाळीचा बाजार असल्याने दिवाळीचा बाजार घेऊन आपल्या गावी जाण्याकरता प्रवासी ऑटोमध्ये बसले प्रवासी घेऊन तेल्हारा इथून ऑटो निघाला असता खापरखेड फाटा जवळ अकोला येथून तेल्हाराकडे येणारे चार चाकी वाहन स्विफ्ट डिझायर या दोन वाहनांमध्ये धडक झाली असून एक जण ठार झाला. आठ ते दहा जण जण जण जखमी झाले असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली मृत्यू झालेल्या मध्ये



दीपक दुबे वय ३८ याचा मृत्यू झाल्याची माहिती असून जखमी झालेल्यांची नावे व वृत्तलेपर्यंत कळू शकले नाही घटनास्थळी घडलेल्या माहितीनुसार ऑटो चा यामध्ये चुरळा झाला आहे. तसेच प्रत्यक्षदर्शी व सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार चार चाकी वाहन हे विरुद्ध दिशेने आल्याने हा अपघात झाला ऑटो मध्ये बसलेले प्रवासी हे आपल्या दिवाळीचे सामान घेऊन घरी परत जात होते दिवाळीच्या पूर्वसन्येला मृत्यू पावलेल्या व जखमी झालेल्या कुटुंबीयांवर संक्रांत आली

## मोफत ई-केवायसी व नवीन मतदान कार्ड नोंदणी शिबिर

अकोट : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत महिलांसाठी मोफत ई-केवायसी शिबिर तसेच नवीन मतदान कार्ड नोंदणी शिबिर हा उपक्रम १८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, दिवानझुरी येथे यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमाचे आयोजन लताताई सं. वाकोडे व राहुल सं. वाकोडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. शिबिराला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक महिलांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत आपले ई-केवायसी पूर्ण केले, तर नागरिकांनी नवीन मतदान ओळखपत्रासाठी नोंदणी केली.

# शासकीय मुलांचे बालगृह निरीक्षण गृह अकोला येथे दिवाळी पहाट कार्यक्रम संपन्न

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

दिवाळी सण संपूर्ण देशात साजरा केला जातो दिवाळी सण ५ दिवसाचा असतो या ५ ही दिवसाचा आनंद बालगृहातील बालके यांना घेता यावा या करिता दिवाळी चा प्रथम दिवशी धनतेरस च्या पहाटे शासकीय बालगृहात दिवाळी पहाट कार्यक्रम चे आयोजन महिला बाल विकास विभागाच्या अंतर्गत बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समिती अकोला यांच्या वतीने आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्प लाईन, रेल्वे चाईल्ड हेल्प लाईन, विपला फाउंडेशन, एसेस टू जस्टिस, एन्करेज फाउंडेशन,या सर्वांच्या सहकार्याने करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीमती एम.एस भदाणे मॅडम, बाल न्याय मंडळ अध्यक्ष श्रीमती सुवर्णा कुळकर्णी मॅडम, बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य अॅड. संजय सेंगर लाभले होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू



लाडुलकर यांनी केले तर प्रास्ताविक जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, श्री गिरीश पुसदकर यांनी केले. या वेळी बाल कल्याण समिती अध्यक्ष अॅड अनिता गुरव, सदस्य राजेश देशमुख, अॅड शीला तोशनीवाल, बाल न्याय मंडळ सदस्य अॅड सारिका घीरणीकर, भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक मेसरे मॅडम, सरकारी वकील एडवोकेट चांडक उपस्थित होते. वरील सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## जवाहर विद्यालयातील १३ खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड

■ जामठी बु. ,दि २० (प्रतिनिधी) :

स्थानिक जवाहर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील १३ खेळाडूंची विभागीय स्तरावर खेळण्याकरिता निवड झालेली आहे. त्यामुळे शाळेच्या लौकिकात भर पडली आहे. १४ वर्ष वयोगटातील ८० मीटर हर्डल, लांब उडी व रीलेमध्ये अंश काळे, ८० मीटर हर्डल व रीलेमध्ये राजविर हिरडकार, रिलेमध्ये संस्कार नांदेकर व रुद्र रुपेश कडू, उंच उडीमध्ये कार्तिक सोळंके, वेदिका बोळे उंच उडी व लांब उडी, निधी वानखडे ८० मीटर हर्डल व उंच उडी, आराध्या गिरी गोळा फेक. १७ वर्ष वयोगटातील प्रतीक साऊतकर उंच उडी, पायल गाडवे ४०० मीटर, रिंकू काळे तिहेरी उडी. १९ वर्ष वयोगटातील वैशाली चव्हाण भालाफेक, दीपाली पवार ३००० मीटर धावणे, अशी या यशस्वी खेळाडूंची नावे आहेत. या सर्वांची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. या सुयशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब देशमुख, कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष कुंदनकुमार देशमुख, प्राचार्य प्रमोद महल्ले, पर्यवेक्षिका विमल काटकर, एस.पी. सातपुते, हरीश दुबे यांनी कौतुक केले आहे.

## दिवाळीच्या पूर्वसंध्येला अकोला महानगरपालिकेची विशेष स्वच्छता मोहीम

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

दिवाळीच्या शुभपर्वाच्या पूर्वसंध्येला अकोला महानगरपालिकेच्या (मनपा) स्वच्छता विभागातर्फे शहरात 'विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नागरिकांना सणासुदीच्या काळात स्वच्छ आणि धूळमुक्त रस्ते उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने मनपाने शहरातील प्रमुख बाजारपेठा आणि निवासी भागांवर लक्ष केंद्रित केले. या विशेष मोहिमेअंतर्गत शहरातील खालील प्रमुख भागांमध्ये रस्त्यांवरील धूळ आणि कचरा साफ करण्यात आला. जनता बाजार, जुना कापड बाजार, जुना किराणा बाजार, कोठारी बाजार आणि जनता भाजी बाजार. खुले नाट्यगृह परिसर, सिंधिकॅम्प भाजी बाजार, संत तुकाराम चौक भाजी बाजार, गौरक्षण रोड, कौलखेड, मलकापूर आणि केशवनगर आदी ठिकाणी मनपाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी परिश्रमपूर्वक काम करून रस्त्यांवरील साचलेली धूळ आणि कचरा तत्काळ हटवला, जेणेकरून सणाच्या निमित्ताने खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना स्वच्छ वातावरण मिळेल.

स्वच्छता मोहिमेमुळे शहराचे सौंदर्य वाढले असून, नागरिकांनी मनपाच्या या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. महानगरपालिकेने नागरिकांनाही शहराचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी कचरा रस्त्यावर न टाकता, मनपाच्या कचरा संकलन यंत्रणेचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

## त्रिरत्न महासंघाच्या वतीने ध्यान साधना व धम्म प्रशिक्षण शिबिर

**अकोला** : १८ ऑक्टोबर २०२५ पासून त्रिरत्न बौद्ध महासंघ अकोलाचे धम्म प्रशिक्षण व ध्यान साधना शिबिर बार्शीटाकळी येथील प्रभू पार्वती मंगल कार्यालयात सुरू झाले असून शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. धम्मचारी नागसंभव पुणे हे शिबिराचे प्रमुख प्रशिक्षक म्हणून नेतृत्व करीत आहेत. धम्म जीवन समजून घेऊन अधिक गंभीर धम्माचरण करण्यासाठी दिवाळीच्या सुट्टीमध्ये त्रिरत्न बौद्ध महासंघ अकोला यांचे वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरात एकूण १५० महिला पुरुष सहभागी झालेले आहेत . शिबिराचे नेतृत्व पुण्यातील अभ्यासू धम्मचारी नागसंभव हे करीत असून त्यांना सहकारी धम्मचारी म्हणून धम्मचारी आर्यसिद्धी अमरावती, धम्मचरणी रत्नतारका अमरावती, धम्मचारी कृपावीर अकोला, धम्मचारी आनंदचित्त अकोला, धम्मचारी बोधीमानस अकोला, धम्मचारी अमेयसागर अकोला व धम्मचारी आनंददीप नागपुर यांचे मार्गदर्शन मिळत आहे. धम्म शिबिरात सकाळी सहा वाजता शिकून सात वाजता ध्यान साधना प्रशिक्षण व सराव धम्म प्रवचन गटचर्चा व्यक्तिमत्व विकासासाठी संपर्क सराव व वैयक्तिक संपर्क शिकविण्यात येत आहे. रात्रीला पूजा व प्रवचन आयोजित केले असून मौनाचे पालन करण्यात येत आहे.

## बाह्यस्त्रोताद्वारे भरणार शिक्षकांच्या रिक्त जागा

**अकोला :** आदिवासी विकास आयुक्तांच्या आदेशान्वये शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांची रिक्त असलेली पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येत आहेत. त्यासाठी मे. छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था आणि मे. महाराष्ट्र विकास ग्रुप या संस्थांना आदेश देण्यात आला आहे. या संस्थांमार्फत शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत आहे. या संस्थांमार्फत शासकीय आश्रमशाळेवर याआधी नियुक्ती देण्यात आलेल्या शिक्षकांपैकी काही शिक्षक हे अद्याप शाळेवर हजर झाले नाहीत. त्यामुळे अकोला, वाशिम व बुलढाणा या कार्यक्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला. जे शिक्षक अद्याप हजर झालेले नाहीत त्या जागांचा विचार करून विषयानुसार रिक्त जागांनुसार पुन्हा अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र उमेदवारांना २० ते ३१ ऑक्टोबरदरम्यान ऑनलाइन अर्ज करता येतील, असे आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात

### सर्वोपचार इमारतीच्या कामाला येणार गती

**अकोला :** शासकीयवैद्यकीय महाविद्यालय संलग्नित सर्वोपचार रुग्णालयाच्या जुन्या इमारतीतील वार्ड स्थलांतरित करण्याचे निर्देश आ. रणधीर सावरकर यांनी मंगळवारीजीएमसीत आयोजित बैठकीत दिले. सुमारे १५० कोटीतून नव्या इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे परंतु वार्डस्थलांतर न झाल्याने पाडकाम रखडले आहे.सध्यारेडिओलॉजी आणि स्त्रीरोगविभाग जुन्या इमारतीत कार्यरत आहेत. या दोन वॉर्डचे स्थलांतर झाल्याशिवाय पाडकाम शक्य नाही, हे बांधकाम विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. या संदर्भात बांधकाम विभागाने रुग्णालय प्रशासनाशी दोन वेळापत्रव्यवहार केला असून, स्थलांतरासाठी जागा, यंत्रणा आणि मानवी संसाधने उपलब्ध करण्यात वेळ लागत असल्याने स्थलांतराला विलंब होत असल्याचे कारण समोर केले जात आहे. सध्या सर्वोपचारच्या जुन्या इमारतीतसीएस कार्यालय आहे.

### वंचितांची सामाजिक दीपावली उत्साहात साजरी

**अकोला :** दीपावली सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. अशा वेळी समाजातील वंचित, दुर्बल, पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती करणारे कुटुंब परिस्थिती हलाखीची असल्याने दिवाळी साजरी करू शकत नाहीत. त्यांच्याही जीवनात दिवाळीचा आनंद भरण्यासाठी शहरातील अथर्व मल्टिपर्पज सेवा संस्था मागील चार वर्षांपासून पुढाकार घेत असते. याचाच भाग म्हणून यावर्षी दीपावलीच्या पूर्वसंध्येला स्व. अथर्व सीमा अनिल मुळे याचे पाचव्या स्मृतिप्रीत्यर्थ शहराच्या विविध भागात रस्त्याच्या कडेला पाल, राहुटी टाकून राहणाऱ्या कुटुंबाचा शोध घेऊन त्यांच्या झोपडीत जाऊन फराळांच्या थैल्याचे वाटप करून त्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच दिवाळीत चौकाचौकांत फडे, झाडू, पणत्याची विक्री करून पोटाची खळगी भरणाऱ्या कुटुंबालाही फराळाच्या थैल्यांचे वाटप करून त्यांचीही दिवाळी गोड करण्याचा तालुक्यातीलप्रयत्न केला तसेच शहरातील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणारी कस्तुरी चॅरिटेबल संस्थेच्या वंचितांची दिवाळी या उपक्रमात सहभागी होऊन धनतेरसच्या पूर्वसंध्येला १७ ऑक्टोबर रोजी चिखलदरा आदिवासीबहुल दुर्गम गांव रुईफाटा येथे जाऊन तेथील ९५ आदिवासी कुटुंबांचा झोपडीत जाऊन फराळांच्या थैल्यांचे वाटप करून तसेच महिलांना साडीचे वाटप केले.

### एससी विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती !

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जातीच्या अनुसूचित विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ साठी ऑनलाइन महाडीबीटी प्रणाली कार्यान्वित केलेली आहे. मुख्याध्यापकांनी ऑनलाइन अर्ज भरण्याचे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# विद्यांचलच्या विद्यार्थ्यांनी 'व्होकल फॉर लोकल' मोहिमेला दिले प्रोत्साहन

■अकोट,दि २० (प्रतिनिधी) :

सामाजिक जबाबदारी आणि देशभक्तीच्या भावनेचे कौतुकास्पद प्रदर्शन म्हणून, अकोट येथील विद्यांचल शाळेतील इयत्ता ९ वी आणि १० वी च्या विद्यार्थ्यांनी सीबीएसईने आयोजित केलेल्या प्रतिष्ठित डेव्हलप इंडिया बिल्डथॉन २०२५ अंतर्गत 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

दिवाळीच्या उत्सवादरम्यान, विद्यार्थ्यांनी पारंपारिकपणे बनवलेल्यादिवेआणि स्थानिक पातळीवर उत्पादित वस्तूंना प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक बाजारपेठांना भेट दिली. त्यांनी खरेदीदारांशी संवाद साधला आणि त्यांना स्थानिक कारागिरांना पाठिंबा देण्यास आणि मोठ्या प्रमाणात उत्पादित उत्पादनांपेक्षा स्वदेशी उत्पादने निवडण्यास प्रोत्साहित केले. शिक्षिका अलिफिया आलमदार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यालयाचे निर्देशक श्री दिनेश भुतडा यांच्या सक्षम नेतृत्वाखाली,




विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय पुढाकार आणि संवाद कौशल्ये प्रदर्शित केली. शाळा व्यवस्थापनाने मोहिमेला पूर्ण पाठिंबा दिला आणि त्याच्या यशासाठी आवश्यक संसाधने प्रदान केली. या उपक्रमाला समुदायाकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला, रहिवाशांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि स्थानिक व्यवसायांना पाठिंबा देण्याचे वचन दिले. या मोहिमेमुळे केवळ स्थानिक उद्योजकतेला चालनाच मिळाली नाही तर सहभागींमध्ये आर्थिक जागरूकता आणि सांस्कृतिक अभिमान निर्माण झाला.

## सायबर सुरक्षा,जनजागृतीविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**वाडेगाव :** स्थानिक श्री जागेश्वर विद्यालय तथा श्री जागेश्वर इंग्लिश स्कूलमध्ये १६ ऑक्टोबर रोजी 'सायबर सुरक्षा व जनजागृती' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रकाश झोडगे, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन बाळापूर तसेच हेकॉ रवी राऊत आणि इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान झोडगे यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन आयुष्यात वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देतयासरता घ अमे त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत अतिशय सोप्या आणि समजण्यासारख्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणांद्वारे सायबर क्राइम टाळण्यासाठी आवश्यक असलेली दक्षता व सायबर गुन्हा घडल्यास घ्यावयाची कायदेशीर पावले याबद्दल सविस्तर माहिती दिली. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून रमेश ठाकरे, अध्यक्ष बहिणाबाई खोटरे विद्यालय बाळापूर यांनी हजेरी लावली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री जागेश्वर विद्यालय परिवाराने सर्व आवश्यक व्यवस्था पोलीस प्रशासनास उपलब्ध करून दिल्या. या प्रसंगी मुख्याध्यापिका गावंडे, शिक्षक प्रणव मानकर तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सायबर सुरक्षेविषयी अनेक प्रश्न विचारले.

RNI NO-46973/1986 | Dainik Mahasagar Akola | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय.नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ | महासागर अकोला | **मालक,मुद्रक प्रकाशक** :श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपुर ४४००१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर कॉम्प्लेक्स, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूहसंपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक:पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

